ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2022- Vol. 11 No. 2

# मराठी ग्रामीण नाटकातील समाजवास्तव

**डॉ. रविंद्र तिरपुडे**
*सहा. प्राध्यापक*
*डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर*

मानवी अस्तित्वाचा शोध घेणारा व जीवनाच्या निरर्थकतेचा, मानवी स्वभावाचा, समाजातील वेगवेगळ्याा प्रवृत्तीचा वेध घेऊन, मानवी, अस्तित्वाशी जवळीक साधणारा नाटक हा एक वाङ्मयप्रकार आहे.

कोणताही नाटककार असो तो समाजाचा एक घटक असतो त्याच्या दृष्टीस पडणाऱ्या व अनुभवास येणाऱ्या असंख्य घटना त्याचा मनाचा ठाव घेतात आणि मग तो आपल्या नाटकाच्या माध्यमातून समाजाचे असंख्य प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करतो. म्हणूनच 'साहित्य हा समाजाचा आरसा आहे' असे म्हटले जाते. नाटककाराला समाजातून जे मिळतं त्याची परतफेड तो आपल्या साहित्यकृतीमधून करीत असतो. एकूणच समाजाशिवाय लेखक साहित्याची निर्मिती करू शकत नाही. साहित्याची निर्मिती करीत असतांना तो घटनांचा क्रमवार विचार करून त्या अभिव्यक्त करीत असतो, कारण कथानक आणि आशयसूत्र त्या घटनांवर अवलंबून असतात.

साहित्यकृतीची निर्मिती होत असतांना त्या–त्या काळाचा सामाजिक, आर्थीक, धार्मिक परिस्थितीचा परिणाम साहित्यावर होत असतो. तसाच नाटकांवर सुद्धा होतो. प्रामुख्याने ग्रामीण नाटकांचा अभ्यास करतांना त्यामधून अभिव्यक्त होत असलेल्या सामाजिक आशयाचाही अभ्यास करावा लागतो. ग्रामीण नाटकांचा अभ्यास करतांना, गाव, खेडे, लोकजीवन, तेथील संस्कृती, रुढी– प्रथा–परंपरा सण–उत्सव, सामाजिक, धार्मिक, आर्थीक राजकीय जीवन यांचाही विचार करावा लागतो. शहरी जीवनापेक्षा एक वेगळ्या प्रकारचे जीवन ग्रामीण भागातील असते, त्यांची वागण्याची, जगण्याची जीवनशैली वेगळी असते.

गरीबीचा फायदा घेणारा सावकार, गरीब शेतकरी, मजूर, बाई– आणि बाटलीतच्या आहारी गेलेला गावचा पाटील, इनामदार, अशा प्रकारच्या विविध व्यक्तीरेखा ग्रामीण भागात दिसतात. आणि याच व्यक्तीरेखांचा वापर ग्रामीण नाटकात मोठया प्रमाणात केला आहे.

सामाजिक समस्या मांडणारी ग्रामीण नाटकांची निर्मिती ही मा. ज्योतीबा फुले यांच्या पासून ते प्रेमानंद गज्वी या नाटककारापर्यंत झालेली आहे. अनेक नाटककारांनी वेगवेगळया समस्या आपल्या नाट्यांमधून मांडलेल्या दिसतात. मा. फुल्यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकात शेतकऱ्याला त्रास देणारा पाटील आहे. नामदेव व्हटकर यांच्या 'वाट चुकली' या नाटकात जातीयतेचा प्रश्न मांडला आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या 'इमानदार' नाटकात जुलमी इमानदाराचे चित्रण येते. मो. ग. रांगणेकर यांच्या 'वहिणी' या नाटकात धाडसी निर्णय घेणाऱ्या स्त्रीचे चित्रण येते. आबासाहेब आपटेकर यांच्या 'घराणे' या नाटकामधून दारुमुळे घर कसे बरबाद होते याचे चित्रण येते. त्याच प्रमाणे 'रक्ताचं नातं' या नाटकात शेतकरी व शिक्षक यांच्या तणावाचे वर्णन येते. कमलाकर बोरकर यांच्या 'जन्मदाता' या नाटकात हुकुमशाह प्रमाणे वागणारा बाप दिसतो. गणेश हिर्लेकर यांच्या 'भाग्याचं कुकू' या नाटकात न्यायासाठी स्वतःच्या वडीलाचा खून करणारी मुलगी आहे. के.डी. पाटील यांच्या 'सोन्याची लंका' या नाटकात कलेची जोपासना करणारी नर्तकी दिसते. प्रेमानंद गज्वी यांच्या तनमातोजी नाटकात वेभिचारी, क्रुर पाटील दिसतो. वरील संपूर्ण नाटकात गरीबी, श्रीमंती, सावकार, शेतकरी, शेतमजूर, कामगार, वेटबिगार, भिकारी व तमाशाच्या माध्यमातून कलेची जोपासना करणारी स्त्री अशा विविध प्रकारचा व्यक्तीरेखा ग्रामीण जीवनात पाहायला मिळतात. त्यांचे विभिन्न स्वभाव, त्यांच्या वेगवेगळ्या समस्या, त्याचे रिती–रिवाज, जातीयता, प्रथा–परंपरा, विविध संस्कृती दारिद्रय या ग्रामीण नाटकांमधून नाटककारांनी प्रवाहीत झालेल्या आहेत.

समाजात अनेक जाती, धर्म पंथाचे तसेच आर्थिक दृष्टया आणि सामाजिक दृष्टया तफावत असलेली लोक राहतात. यामुळे त्यांचे अनेक प्रश्नही आपल्या दृष्टीस पडत असतात. समाजातील अनिष्ठ रुढी प्रथा परंपरेमुळे समाजातील विशिष्ट लोकांवर अन्याय अत्याचार होतांना प्राचीन काळापासून ते आजपर्यंत पाहिजे त्या प्रमाणात कमी झालेला दिसत नाही.

समाजातील अनिष्ठ रूढी प्रथा परंपरेविरुद्ध अनेक संतानी, समाजसुधारकांनी आवाज उठविला होता. समाज जागृती वासाकी करावी लागली होती. त्यामुळे थोड्याफार प्रमाणात सामाजिक समस्या कमी होण्यास मदत झाली.

शिक्षणाच्या अभावामुळे मोठया प्रमाणात गोर–गरीब लोकांची पिळवणूक आणि फसवणूक होत होती. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार झाला. 1956 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्विकार करून दीन दुबळ्याा समाजाला नवी चेतना दिली, शिक्षणाचा मार्ग

दिला आणि त्यातूनच पुढे वेगवेगळे साहित्यप्रवाह उदयास आले. त्यामुळे स्वतःवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव त्या लोकांना होऊ लागली. अन्यायाला वाचा फोडण्याकरिता, सामाजिक समस्यांची साहित्याच्या क्षेत्रात त्यांची दखल घेतली जात होती. त्यामुळे अन्यायाचे स्वरूप बदलले, मात्र आजही ग्रामीण भागातील अन्याय कमी झालेल्या दिसत नाही याचे चित्रण ग्रामीण नाटकात पहावयास मिळते.

अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' या नाटकापासून ते प्रेमानंद गज्वी यांच्या 'तनमाजोरी' या नाटकांपर्यंत ग्रामीण जनतेवर अन्याय करणारे गावातील तथाकथीत लोक आहेत. मात्र त्यांना शह देण्यासाठी बंडबोर नायकही या नाटकांमध्ये आहेत. ग्रामीण भागातील अंध–श्रद्धा 'देवदासी' या सारख्या नाटकांमध्ये अंधश्रद्धेला बळी पडणाऱ्या मुली आहेत. याचे चित्रण अनेक नाटककारांनी आपल्या नाटकांमधून केले आहेत.

डॉ. सतीश पावडे म्हणतात त्याप्रमाणे, 'जीवनाच्या प्रवाहातील अस्तित्वजन्य, परात्मता, एकटेपणा, दुरावा, व्याकुळला वैताग, कंटाळा, रिक्तता, पोकळी तसेच मानसिक विखुरलेपणा, मानसिक वेडेपण या मानसिक दुखण्याकडे वेधते.''[1] ग्रामीण नाटकांमध्ये विसंगतीचे भेदक दर्शन आणि आस्तित्वात असलेल्या वर्तमानातील प्रश्नांच्या विविध छटा दिसतात.

ग्रामीण नाटके, ग्रामीण संस्कृतीशी त्यांच्या रूढी, प्रथा, परंपरेशी, सण–उत्सव संस्कृती यांच्याशी नाते सांगणारी आहेत. या नाटकांमधून ग्रामीण समाजातील विविध व्यक्तीरेखांचा खेडयातील सांस्कृतिक जीवनाचा कौटुंबिक जीवनांचा, सामाजिक, धार्मिक, आर्थीक जीवनाचा त्यांच्या हेवेदाव्यांचा उहापोह या ग्रामीण नाटकांमधून केलेला आहे. या नाटकांच्या रुपाने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे, क" टकऱ्याचे जीवन करते नव्हे तर एकूणच ग्रामीण जीवनाची विविधता या नाटकांचा माध्यमातून आपल्याला कळते. आज वर्तमानकाळातही ग्रामीण जीवन ज्या प्रमाणात बदलायला पाहीजे होते त्या प्रमाणात बदललेले दिसत नाही, आजही शेतकरी कर्जात जगतो आणि सहनशीलता संपली की आत्महत्या करतो. अशा प्रकारचे चित्र दररोज वर्तमानपत्रातून साहित्याच्या मानमातून वाचत आणि अनुभवत असतो. या घटना मन हेलावून सोडणाऱ्या असल्या तरी त्या केवळ प्रश्नांच्या स्वरूपात राहतात.' या प्रश्नाला जेंव्हा हा समाज, हा देश उत्तर देईल, तेव्हा शेतकरी सुखी होईल. ग्रामीण समाज – जीवनाचे बोलके वर्णन ग्रामीण नाटकांमध्ये ज्या पद्धतीने व ज्या प्रमाणात यायला पाहिजे होते. त्या प्रमाणात अजूनही आलेले दिसत नाही.

## संदर्भ दिपा

1. पावडे सतीश, 'द मिस्टर ऑफ द ॲब्सर्ड', विजय प्रकाशन, नागपुर, 2018, पृ.151

## संदर्भ ग्रंथ

1. तेंडुलकर विजय (संपा), 'साहित्यातून साहित्याकडे', डिंपल प्रकारान, वसई रोड स्टेशन, प्र.सा.198.
2. तिरपुडे रवींद्र, 'प्रेमानंद गल्ली यांची नात्यदृष्टी स्वरूप आणि समीक्षा' युरो वर्ड पब्लीकेशन, मुंबई, 2019.